**सरकारतर्फे साक्षीदार क्रं.- ०२**

| | | |
|---|---|---|
| साक्षीदाराचे नाव | - | भागवत केशव कोहळे |
| वय | - | ४० वर्ष |
| धंदा | - | पोलिस हवालदार |
| राहणार | - | मध्यवर्ती कारागृह, वर्धा, जि.वर्धा. |

## सरतपासणी सरकारतर्फे ॲड. श्री. बारस्कर

१. दि.२६.०५.२०१४ रोजी मी मध्यवर्ती कारागृह नागपुर येथे पोलिस हवालदार या पदावर कार्यरत होतो. त्यावेळी कारागृहाचे अधिक्षक हे वैभव कांबळे हे होते. त्याचदिवशी अधिक्षक साहेबांनी माझे नावे पोलिस स्टेशन बेला येथे आरोपी संजय मधुकर मुन, बंदी क्रं.७०७३ याच्याविरूध्द तक्रार नोंदविण्यासाठी पत्र दिले होते. आरोपी संजय याला १० दिवस अभिवचन रजा व ७ दिवसाचा वाढीव कालावधी मंजुर झाला होता. त्यानुसार आरोपीला दि.२६.०२.२०१५ पर्यंत कारागृहात परत येणे आवश्यक होते परंतु तो रजा संपुनही कारागृहात परतला नाही म्हणुन मी पोलिस स्टेशन बेला येथे तक्रार दिली. सदरची तक्रारीची प्रत आता मला दाखविण्यात आली ती तीच असुन त्यावर माझे नाव आहे व कारागृह अधिक्षक साहेबांची सही आहे, मी त्यांच्या अधिपत्याखाली काम करीत असल्यामुळे मी त्यांची सही ओळखतो. ती निशाणी ०६ वर आहे. आता मला एफ.आय.आर.ची नक्कल दाखविण्यात आली त्यावर माझी सही असुन त्यातील मजकुर बरोबर आहे, तो एफ.आय.आर. निशाणी ०७ वर आहे.

## उलट-तपासणी आरोपीकरीता ॲड. तोवर

२. आरोपीच्या निशाणी ०८ वरील अर्जानुसार उलटतपास पुढील

तारखेपर्यंत तहकुब करण्यात आला.

वा. दा. ब. अ. क. केले

माझे समक्ष

(डि.बी.गुट्टे)
प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी उमरेड
दि.२०.१२.२०१६

(डि.बी.गुट्टे)
प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी उमरेड
दि.२०.१२.२०१६